INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

October-November 2022 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue-306

## Multidisciplinary Issue



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's M.S.G. Arts, Science & Commerce College,
Malegaon (Camp), Dist – Nashik [M.S.] India.

Executive Editors :
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

October-November 2022 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue-306

## Multidisciplinary Issue

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV's M.S.G. Arts, Science & Commerce College,
Malegaon (Camp), Dist – Nashik [M.S.] India.

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede,** Kinwat (Hindi)
**Mrs. Bharati Sonawane,** Bhusawal (Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

***- Chief & Executive Editor***

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo :** From the Paper 'Preservation of Myxomycetous Biodiversity from Navegaon Bandh, Dist. Gondia, Maharashtra (India) : II, N. V. Chimankar.

© **All rights reserved with the authors & publisher**

**Price : Rs. 1000/-**



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue 306: Multidisciplinary Issue
Impact Factor : 6.625 (SJIF) Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-2022

# INDEX


| No. | Title of the Paper / Name | Author's | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 01 | Mary Carpenter and Orientalism | **Priyanka Srivastava** | 05 |
| 02 | Preservation of Myxomycetous Biodiversity from Navegaon Bandh Dist. Gondia, Maharashtra (India) : II | **N. V. Chimankar** | 10 |
| 03 | Study of Wild Edible Fruit Plants Resources with Concern to Nutritional Values and Uses by Tribals From the Forest of Western Part Statpuda | **Sanjay A. Khairnar** | 16 |
| 04 | Psychological Study of the Characters in the Novels of Joseph Conrad | **Dr. Surendra Khandekar** | 24 |
| 05 | Effect of Yoga on Emotional Intelligence among Senior College Students in Nashik District | **Dr. Ramesh Nikam, Mr. Kishor Ankulnekar** | 30 |
| 06 | Impact of Socio-Economic Factors on the Health of Tribal Women in Gadchiroli District (2017-2018) | **Dr. Sonali Wagh** | 35 |
| 07 | Social Changes in Rehabilitated Village Tahakali, Dist- Jalgaon (MS) (Case Study of Rehabilitated Village of Hatnur Irrigation Project) | **Dr. Sanjay Bhaise** | 51 |
| 08 | Development of Multimedia Programme in History Subject at the Secondary Level | **Prof . Chhaya Gadwe** | 55 |
| 09 | An Application Study of Self-Made Teaching Aids for Knowledge Constructivism of Concept Teaching Learning of Science and Technology Subject at Secondary Level | **Dr. Swati Tayade** | 61 |
| 10 | Freely Available Open Access Publication | **Dr. Prashant Pagade** | 70 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 11 | लोकगीतों के संकलनकर्ता के रूप में गोविन्द चातक | **डॉ. शोभा रावत** | 73 |
| 12 | सुषम बेदी द्वारा लिखित 'पानी केरा बुदबुदा' में सह-अस्तित्व के अभाव में छटपटाती नारी | **डॉ. राजेश भामरे, सरला चिमणकर** | 77 |
| 13 | सृजनशील नाटककार नरेंद्र मोहन | **डॉ. शिवाजी सांगोळे, अरुण आहेर** | 81 |
| 14 | निर्मला पुतुल की कविताओं में आदिवासी जीवन | **प्रा. शांताराम वळवी** | 86 |
| 15 | स्मार्ट क्लासरूम : संकल्पना एवं यथार्थ | **डॉ.सुमेध नागदेवे** | 64 |
| | **मराठी विभाग** | | |
| 16 | प्राचीन काळातील स्त्रीजीवन व विवाह पद्धती : एक दृष्टिक्षेप | **प्रा. जितेंद्र पगार** | 99 |
| 17 | आदिवासी अर्थव्यवस्था | **प्रा. कृष्णा पाडवी** | 104 |
| 18 | वडार समाजाचा इतिहास व उत्पत्ती | **श्री. अनिल गोटे** | 108 |
| 19 | अहिराणी बोलीतील 'स्त्री'विषयक अभिव्यक्ती | **डॉ. योगिता पाटील** | 113 |
| 20 | पेशवेकालीन नशिराबाद परगण्यातील व्यापार | **श्री. दिपक किनगे** | 116 |
| 21 | संत जनाबाई यांचा भक्तीभाव व वाङ्मयातील तत्त्वज्ञान | **तृप्ती तोडकर** | 120 |
| 22 | दलित कादंबरी : स्वरुप व वैशिष्ट्ये | **डॉ. प्रवीण ताटे देशमुख** | 125 |
| 23 | 'झेलझपाट' कादंबरीतील सामाजिक आशय | **डॉ. सुलतान पवार** | 131 |
| 24 | आशा बगे यांच्या कादंबऱ्यामधून स्त्री मनाचा वेध घेण्याची प्रवृत्ती | **डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे** | 137 |




Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 25 | 'आयदान' एक स्त्रीवादी दलित आत्मकथन | **डॉ. संगीता पैकेकरी** | 141 |
| 26 | १९९० नंतरच्या कादंबरीचा स्त्रीवादी विचार | **डॉ. शीतल कोरडे** | 148 |
| 27 | नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीतील राजकीय चित्रण | **डॉ. छाया तांबे** | 154 |
| 28 | 'वाट तुडवताना' या आत्मकथनातील वैचारिकता | **डॉ. अतुल चौरे** | 159 |
| 29 | 'रान पेटलं तसं मन पेटलं' मधील कवितांचे वेगळेपण | **डॉ .भाऊसाहेब गमे** | 166 |
| 30 | 'अधिवास' : सुंद्राचा संघर्षमय जीवनप्रवास | **प्रा.रोहिणी मदने, डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर** | 170 |
| 31 | उषा प्रभुणे यांचे प्रवास वर्णन 'अमेरिका आणि अमेरिकन्स' : काही दृष्टिक्षेप | **मनीषा औटी** | 183 |
| 32 | चरित्र - आत्मचरित्र : संकल्पना व स्वरूप | **गौतम बनसोडे** | 189 |
| 33 | सत्याग्रहाचे शास्त्र | **डॉ. पंडित लावंड** | 192 |
| 34 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार : एक चिकित्सक अभ्यास | **डॉ. लता आंदे** | 195 |
| 35 | शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये (बी.एड्) शालेय व महाविद्यालयीन सुरक्षा आपत्ती व्यवस्थापन व आराखड्याबाबत घेतलेल्या प्रशिक्षणाची परिणामकारकता अभ्यासणे | **डॉ. सतीश पाटील** | 201 |
| 36 | वर्मिन (उपद्रवी) वन्यजीव आणि वन्यजीव संरक्षण कायदा : एक दृष्टिक्षेप | **डॉ. सुभाष दोंदे** | 206 |
| 37 | उद्योजकता : बेरोजगारी दूर करण्यासाठी काळाची गरज | **प्रा.उदय टेके, डॉ. सोमनाथ सानप** | 214 |
| 38 | महाराष्ट्रातील साखर कारखादारी समोरील समस्या एक अभ्यास | **पल्लवी मोरे** | 219 |
| 40 | شجاع کامل : ناندیڑ کے ادبی اُفق کا ایک بے باک قلمکار | ڈاکٹر سید حسین زیدی<br>**Dr. Syed Husain H. Zaidi** | 223 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.* ***- Chief & Executive Editor***



Scanned with OKEN Scanner

# पेशवेकालीन नशिराबाद परगण्यातील व्यापार

**श्री. दिपक दिनकर किनगे**
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,
डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव
मोबाइल क्र. ९४२१११८२७५
इमेल- ddkinge@gmail.com

नशिराबाद परगण्यात बाजारपेठेचे महत्त्वाचे केंद्र म्हणजे कसबा नशिराबाद होते.[१] त्यामुळे येथे आठवडी बाजार भरत होता. परगणे नशिराबादमध्ये तयार होणाऱ्या विविध वस्तू, अन्नधान्य, कपडे, भाजीपाला यांची दुकाने लागत होती. पेशवेकाळात खादीच्या कपड्यापासून पाली तयार केल्या जात असा उल्लेख इ. स. १७९०-९१ च्या सादिलझाड्यात मिळतो.[२] अशा पाली टाकून कसबा बाजारपेठेत दुकाने लावली जात होती.

नशिराबाद परगण्यातील व्यापारी वस्तूंची माहिती इ. स. १७६१-६२ ची हिशेब झडती, इ. स. १७७८-७९, १७७९-८०, १८११-१२, १८१२-१३ या वर्षांचे ताळेबंद, इ. स. १८०८-०९ ची जिन्नस झडती, १८१०-११ ची यादी इ. पुणे अभिलेखागारातील कागदपत्रांमधून प्राप्त होते.[३] गहू, ज्वारी, बाजरी, उडीद, मुग, तूर, साखर, मीठ, बेसन, पेढे, बर्फी, गुळ, बदाम, खारीक इ. अन्नधान्य व वाण सामान, लवंग, सुपारी, जिर, मोहोरी, हिंग, काथ, वेलदोडे, हळद, मिरी, मेथ्या, सुंट, खसखस, आमसोल, शिंगाडे इ. मसाला पदार्थ, पान, सुपारी, लवंग, वर्खी सुपारी, वर्खी लवंग, काथ, वेलदोडे, तमाखू, आवळकंठी इ. आदरातिथ्याच्या वस्तू, सूत, सुताची नवार, ताग, बऱ्हाणपूरी कापड, पागोटे, तीवट, रेशमी काहाडण्या, मेणकापड, टोपी, धरणगावचे कापड, काळे व हिरवे पागोटे, पातळे, पैठणी, लुगडे, चोळखण, कडदोरा, रेशमी व मशरु कापडाचेठाण, धोत्रजोडी, खादी, तापता, तीवट, मुसनर, छीट, खारव, सतरंजी, घोंगडी, पासोडी, कांबळ, झालरी व गोणपाट इ. कापड माल, घोडे, बैल, म्हैस, गाय, उंट, तट्टू, हत्ती, शिंगरु इ. प्राणी, उस, आंबे, केळे इ. फळ, लोखंड, सोने, चांदी, पितळ, तांबे, शिसे व दारु (स्फोटक पदार्थ) इ धातू., कुणबिणी, पोरगा, पोरगी इ. कागद, चाकू, कातरी, शाई, गोंध इ. कचेरी, दप्तरातील वस्तू, बांगड्या, चांदीचे ताईत, संदुक, कापूर, सरकी, ढेप, रताळी, मिरच्या, राजगिरा, मद्य, कुलुप, पेटी इतर वस्तू

नशिराबाद परगण्यातील व्यापाराची माहिती पुणे अभिलेखागारातील तत्कालीन मोडी कागदपत्रांमधून प्राप्त होते.

**१. कपड्यांचा व्यापार :-**

परगणे नशिराबादमध्ये कपड्यांचा व्यापार मोठ्या प्रमाणात होत होता. इ. स. १७६१-६२ च्या हिशेब झडतीनुसार बऱ्हाणपूरहून १७४ रुपयांचे सुती कापड खरेदी करण्यात आले होते. माहे जिल्कादमध्ये (जून १७६२) आणि १६३। (एकशे सव्वा त्रेसष्ठ) रुपयाचे बऱ्हाणपूरी कापड आणले होते. त्यात १४८ रुपयाच्या पांढऱ्या रंगाचे पागोटे व ०७ रुपयाच्या ०८ रेशमी कहाडण्या पालखीसाठी आणल्या होत्या. त्यातील ०४ गर्भसूती व ०४ कसण्या होत्या. याशिवाय ४। (सव्वाचार) रुपयांची दुरणीस टोपी व १॥ (दिड) रुपयाचे मेणकापड खरेदी करण्यात आले होते.[४]

जिल्हेज (जुलै १७६२) महिन्यात ३९ᑕ= (एकोणचाळीस रुपये दोन आणे) याचे सहा बऱ्हाणपूरी छिट कापडाचे पागोटे खरेदी केले होते. त्यापैकी ०४ कलल दरीदर पागोटे २७ᑕ= (सत्तावीस रुपये दोन आण्याचे), ०१ काळे पागोटे ५॥। (पाऊणेसहा रुपयाचे) आणि ०१ हिरवे पागोटे ६। (सव्वासहा) रुपयाचे होते.[५]



Scanned with OKEN Scanner

इ. स. १७६१-६२ माहे जिल्काद (जून १७६२) मध्ये १२८।। (एकशे साडेअठ्ठावीस) रुपयांचे कापड धरणगावहून आणण्यात आले होते. त्यात ५२। (सव्वा बावन्न) रुपयांचे ४ चौखणे, ४२।।। (पाऊणे त्रेचाळीस रुपये) चे ३ सलीईदार व ३३।। (साडे तेहतीस) रुपयांचे ३ दुखत्ये असे एकूण १० नग विकत आणण्यात आले होते.[६]

इ. स. १७६१-६२ च्या हिशेब झडतीनुसार बऱ्हाणपूरहून २८।। (साडे अठ्ठावीस) रुपयांचे लोखंड व ४ रुपयाचा ताग आणि ४५ रुपयाचे १५ चरसे खरेदी केले होते. त्यापैकी ४ चरसे मालजी शिंदे व १० चरसे नारो विश्वनाथ यांच्या पागेसाठी खरेदी करण्यात आले होते. इ. स. १७६१-६२ माहे मोहरम (ऑगस्ट १७६२) मध्ये कमाविसदार चिंतो नारायण याने अमृतरावासाठी औरंगाबादहून धोतर जोडी आणली होती. या धोतर जोडीची किंमत ५।।= (साडेपाच रुपये दोन आणे) होती, अशी नोंद हिशेब झडतीत आढळते.[७] वरील विवेचनावरुन नशिराबाद परगण्याचा कपड्यांचा व्यापार बऱ्हाणपूर, धरणगाव व औरंगाबाद परगण्यांशी होत होता, हे स्पष्ट होते.

यशवंत मुजूमदार आसखेडा यास सुताची नवार तयार करुन पाठविली होती, असाही उल्लेख १७६१-६२ च्या हिशेब झडतीत मिळतो.[८] नवार म्हणजे पलंग किंवा खाट विणण्याची दोन-तीन बोटे जाड असलेली कापडाची पट्टी होय.[९]

**२. अन्नधान्याची खरेदी-विक्री :-**

इ. स. १८११-१२ च्या ताळेबंदानुसार ठाणे कडगावातून बाजरी, मुग, ज्वारी, हरभरे, तीळ, धने, तुरी, गहू व कूट इत्यादी शेतीत उत्पादित अन्नधान्य व चारा ४८९।।१०।। (सहाशे साडे एकोणनव्वद टके साडेदहा रुके) रुपयास विक्री केल्याची नोंद आढळते. तर कडगावातून खाजगी जमेतील तूप, गहू, बाजरी, जवस, मुगदाळ, गुळ, तुरीची दाळ, तांदुळ आणि दाळ्या इत्यादी जिन्नसा १८०८।।११ (एक हजार आठशे साडेआठ टके अकरा रुके) यास विकल्याचा उल्लेख आढळतो. वरील ताळेबंदानुसार ठाणे कडगाव येथे सरकारमार्फत खरेदी करण्यात आलेल्या अन्नधान्याची नोंद मिळते. त्यात हरभरे, साळ, तीळ, जवस, उडीद, बाजरी, धणे, मूग, ज्वारी, गहू व तुरी इ. जिन्नसांची खरेदी ४५ रुपये व ३१६५।।१० (तीन हजार एकशे पाऊणेसहासष्ट टके दहा रुके) या रकमेला करण्यात आली होती.[१०] यावरुन ठाणे कडगाव येथे धान्य खरेदी-विक्रीची बाजारपेठ होती.

**३. प्राण्यांचा व्यापार :-**

इ. स. १७७८-७९ च्या ताळेबंदानुसार कमाविसदार नरसो मोरेश्वर याने २७। (सव्वा सत्तावीस) रुपयास एक निळी घोडी व १५० रुपयाला एक पंचकल्याण घोडा खरेदी केला होता, यावरुन निळी घोडी व पंचकल्याण घोड्याच्या किंमती समजतात. तसेच कमाविसदाराने २८।।।≡ (पाऊणे एकोणतीस रुपये तीन आणे) च्या तीन गाई खरेदी करुन सासवडला रवाना केल्या व पाच म्हशी ९५ ≡। (पंच्याण्णव रुपये सव्वातीन आणे) इतक्या रुपयांना विकत घेतल्या, अशी नोंद आढळते.[११] यावरुन इ. स. १७७८-७९ साली साधारणपणे एका गाईची किंमत १० रुपये व एका म्हशीची किंमत १९ रुपये होती, असे स्पष्ट होते.

इ. स. १७७९-८० च्या ताळेबंदानुसार १८६ बैलांची एकुण किंमत २९५७।।।॰। (दोन हजार नऊशे पाऊणे अठ्ठावन्न रुपये एक पैसा) होती. त्यापैकी २ बैल परगणे भडगाव येथे पाठवले त्याची किंमत २५ रुपये होती, अशी नोंद आढळते.[१२] मात्र एकूण बैल व रक्कम यांचा विचार करता साधारणपणे एका बैलाची किंमत १६ रुपये होती.

नशिराबाद परगण्यात घोडे, तट्टू, गाय व बैल या प्राण्यांच्या व्यापाराचे उल्लेख मिळतात. इ. स. १८०६-०७ च्या पोतेझाडानुसार खंडो आपाजी पागेसाठी पुण्याहून निळी घोडी खरेदी करण्यासाठी गेला होता, तर बयाजी नाईक


Scanned with OKEN Scanner

E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-2022

याने ५२१||—|| (पाचशे साडेएकवीस रुपये दीड आणा) आणण्यास १० बैल खरेदी केल्याची नोंद मिळते.[१३] म्हणजे साधारणपणे एका बैलाची किंमत ५२ रुपये होती. घोड्याच्या किमती विषयी नोंद मिळत नाही.

इ. स. १८०६-०७ च्या यादी दफातेपत्रानुसार नशिराबादच्या पागेकडील खंडो आपाजी या कारकूनास सांगण्यात आले होते की, "एखाद्या शहाण्या माणसास परगणे नेमाडात पाठवून १० बैल व ५ गाई खरेदी करा. त्यासाठी ६०० रुपये देण्यात यावे व नेमाड परगण्यातून खरेदी केलेले १० बैल व ५ गाई पुण्यास पाठवून द्यावे." वरील माहितीवरुन ६०० रुपयांना १० बैल व ५ गाई विकत मिळत होत्या आणि परगणे नशिराबादच्या व संपूर्ण पेशवा राज्याचा नेमाड परगण्याशी गाई-बैलांचा व्यापार होत असे, हे स्पष्ट होते.[१४] मात्र इ. स. १८०६-०७ साली एक गाय किंवा एक बैल याची निश्चित किंमत किती होती, हे स्पष्ट करता येत नाही.

**४. स्त्री-पुरुष यांची खरेदी-विक्री :-**

पेशवेकाळात पोर्गा, पोरे, पोरगे याचा अर्थ गुलाम मुले किंवा पुरुष असा होता. कुणबीण, बटकी म्हणजे गुलाम स्त्री होती. गुलाम व्यक्तीची शारीरिक क्षमता, कौशल्य, दिसणे यानुसार त्यांच्या किंमती ठरत असत.[१५] मराठा राज्यात गुलामांची खरेदी-विक्री करण्याची पध्दत होती. हा व्यापार राज्यात सर्वत्र चालू होता.[१६] इ. स. १७६०-६१ मधील पत्रानुसार कृष्णाजी विश्वनाथ प्रांत खानदेश यास असे सांगण्यात आले की, "सरकारात कुणबिर्णीचे प्रयोजन आहे. तरी पायउतारा धावावया योग्य, काळ्या, उंच, बळकट, सडसडीत या बाणाच्या खरेदी करुन असामी १० आणून ठेवणे व खासा स्वारी देशी आल्यावर पाठवून देणे." याचा अर्थ म्हणजे पेशवेसुध्दा खानदेशातून कुणबिर्णीची खरेदी करत असत.[१७] इ. स. १७६१-६२ च्या हिशेब झडतीमध्ये नशिराबाद परगण्यातील ११ कुणबिणी, २ पोरी व २ पोरगे यांचा उल्लेख आढळतो.[१८] वरील माहितीवरुन खानदेशात (नशिराबाद परगण्यात) गुलामांचा व्यापार होत होता, असे स्पष्ट होते.

**समारोप व निष्कर्ष :-**

नशिराबाद परगण्याचा व्यापार पुणे प्रांत, औरंगाबाद प्रांत आणि खानदेश प्रांतातील धरणगाव, बऱ्हाणपुर व नेमाड या परगण्यांशी होत असे. त्यापैकी औरंगाबाद, धरणगाव व बऱ्हाणपुरमधून कापड आयात केल्याचे तर नेमाड परगण्यातून गाय व बैल खरेदी केल्याच्या नोंदी आढळतात. पुणे प्रांतातून नशिराबादच्या पागेसाठी निळी घोडी खरेदी केली जात होती. याशिवाय अन्नधान्य, मसाल्याचे पदार्थ, कापड व तयार कपडे, फळे, प्राणी, विविध धातू व धातूंच्या वस्तू, दप्तर व कचेरीतील साहित्य व इतर किरकोळ वस्तूंची आयात निर्यात होत होती. परंतू त्याविषयी तपशीलवार माहिती प्राप्त होत नाही.

**संदर्भ :**

१. पु. पु., खा. ज., रु. क्र. ३३, हिशेब झडती, परगणे नशिराबाद, इ. स. १७६१-६२.
२. पु. पु., खा. ज., रु. क्र. ३४, सादिलझाडा, परगणे नशिराबाद, इ. स. १७९०-९१.
३. पु. पु., खा. ज., रु. क्र. ३३, हिशेब झडती, परगणे नशिराबाद, इ. स. १७६१-६२.
४. पु. पु., खा. ज., रु. क्र. ३३, ताळेबंद, परगणे नशिराबाद, इ. स. १७७४-७५, इ. स. १७७६-७७, इ. स. १७७८-७९, इ. स. १७७९-८०.
५. पु. पु., खा. ज., रु. क्र. ३६, ताळेबंद, परगणे नशिराबाद, इ. स. १८१०-११.
६. पु. पु., खा. ज., रु. क्र. ३५, जिन्नस झडती, परगणे नशिराबाद, इ. स. १८०८-०९.
७. पु. पु., खा. ज., रु. क्र. ३६, यादी, परगणे नशिराबाद, इ. स. १८१०-११.
८. पु. पु., खा. ज., रु. क्र. ३३, हिशेब झडती, परगणे नशिराबाद, इ. स. १७६१-६२.



Scanned with OKEN Scanner

९. पु. पु., खा. ज., रु. क्र., ३३, हिशेब झडती, परगणे नशिराबाद, इ. स. १७६१-६२.
१०. पु. पु., खा. ज., रु. क्र., ३३, हिशेब झडती, परगणे नशिराबाद, इ. स. १७६१-६२.
११. पु. पु., खा. ज., रु. क्र., ३३, हिशेब झडती, परगणे नशिराबाद, इ. स. १७६१-६२.
१२. पु. पु., खा. ज., रु. क्र., ३३, हिशेब झडती, परगणे नशिराबाद, इ. स. १७६१-६२.
१३. पठाण यू. म., फार्सी-मराठी व्युत्पत्तिकोश, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, पहिली आवृत्ती, मार्च २००८, पृ. ९३.
१४. पु. पु., खा. ज., रु. क्र., ३७, ताळेबंद, ठाणे कडगाव, इ. स. १८११-१२.
१५. पु. पु., खा. ज., रु. क्र., ३३, ताळेबंद, परगणे नशिराबाद, इ. स. १७७८-७९.
१६. पु. पु., खा. ज., रु. क्र., ३३, ताळेबंद, परगणे नशिराबाद, इ. स. १७७९-८०.
१७. पु. पु., खा. ज., रु. क्र., ३५, पोतेझाडा, परगणे नशिराबाद, इ. स. १८०६-०७.
१८. पु. पु., खा. ज., रु. क्र., ३५, यादी दफातेपत्र, परगणे नशिराबाद, इ. स. १८०६-०७.
१९. शिरसट सु. अ., १८ व्या शतकातील प्रांत पुणे : एक आर्थिक अभ्यास, अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, फेब्रुवारी २०२०, पृ. ३२१.
२०. शहा जी. बी., मध्ययुगीन खानदेश, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथम आवृत्ती, जानेवारी २०१५, पृ. २५७.
२१. वाड ग. चि., पारसनिस डी. बी., पेशवा रोजनिशी, भाग - ०२, डेक्कन व्हर्न्याकुलर ट्रान्सलेशनसोसायटी, पुणे, १९०६, पृ. १९५, नोंद : ३०८.
२२. पु. पु., खा. ज., रु. क्र. ३३, हिशेब झडती, परगणे नशिराबाद, इ. स. १७६१-६२

**(शब्दसंक्षेप)**

| | | |
|---|---|---|
| पु. पु. | - | पुणे पुराभिलेखागार |
| खा. ज. | - | खानदेश जमाव |
| रु. क्र. | - | रुमाल क्रमांक |



Scanned with OKEN Scanner